**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ,राजेंद्र नगर,कोल्हापूर ४१६००४**

***<u>परिपत्रक क्र.कोविमं /माध्य. परीक्षा/मार्च २०२० /श्रेणी तक्ते/ 3319 / दिनांक १५/०२/२०२०</u>***

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मार्च **२०२०** **माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस <u>पुनर्रचित अभ्यासक्रमाने</u> प्रविष्ठ होणाऱ्या नियमित (Fresh) व पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते (Grade List) OMR पध्दतीप्रमाणे** मंडळाच्या अधिकृत वितरण केंद्रांमार्फत सर्व शाळांना वितरीत करण्यात आलेली आहेत. तरी सदरची नियमित व पुनर्परीक्षार्थी (**Fresh & Repeater**) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते बिनचूक भरुन ते <u>मंगळवार दिनांक ०३ मार्च, २०२०</u> रोजी वितरण केंद्रावरील प्रतिनिधीकडे निर्धारित वेळेत हस्तपोहोच जमा करण्यात यावेत. **उशीरा प्राप्त होणाऱ्या श्रेणीतक्त्याबाबत दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदरचे श्रेणीतक्ते इतर कोणत्याही पाकिटात न भरता कार्यालयाने पुरविलेल्या श्रेणी तक्त्याच्या पाकिटातच (Grade List पाकिटात) भरुन सदरचे श्रेणीतक्त्याचे पाकिट** पाठंवावे. तसेच श्रेणीतक्त्याच्या पाकिटावर ठळक अंकात शाळेचा सांकेतिक क्रमांक लिहावा. श्रेणीतक्ते वेळेत जमा न केल्यास विद्यार्थ्यांच्या निकालाचे कामात काही समस्या निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

**<u>श्रेणीतक्ते भरताना घ्यावयाची काळजी –</u>**

१) **पुनर्रचित अभ्यासक्रमाद्वारे नियमित (Fresh) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते OMR पध्दतीने भरावयाची असल्यामुळे नियमित विद्यार्थ्यांना या पध्दतीनुसार श्रेणीतक्ते देण्यात आलेली आहेत. (अ)** सदरहू श्रेणीतक्त्यामध्ये हे P1 (Physical Education) & R7 (**<u>स्वविकास व कलारसास्वाद</u>** ) हे शालेय विषय सक्तीचे असल्यामुळे त्यांचे विषय कोड श्रेणी तक्त्यात नमूद केलेले आहेत. या विषयाच्या खालील चौकटीमध्ये आतील चौकटीला स्पर्श न करता खालीलप्रमाणे अंकामध्ये (**Numeric Code**) श्रेणी नोंदविण्यात याव्यात.**फक्त गैरहजर विद्यार्थ्यासाठी AA अशी श्रेणी नोंदविण्यात यावी. श्रेणी तक्ते भरताना कोणत्याही परिस्थितीत व्हाईटनरचा वापर करणेत येवू नये .**

२) श्रेणीतक्ते भरताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकासमोर शालेय व ऐच्छिक विषयाचे **सांकेतांक (Index No.)** नमुद करून त्या विषयात विद्यार्थ्याने संपादित केलेली **श्रेणी (Grade) अंकामध्ये (Numeric Code मध्ये) अचूक नोंदवाव्यात**. श्रेणीतक्त्यात श्रेणी नोंदविताना श्रेणी तक्त्याच्या खाली मुद्रित करण्यात आलेल्या सूचना काळजीपूर्वक लक्षात घेऊन खालील प्रमाणे श्रेणीची नोंद करावी.

- **A ग्रेडसाठी — 3 (60% & above marks)**
- **B ग्रेडसाठी — 2 (45% & 59% marks)**
- **C ग्रेडसाठी — 1 (35% & 44% marks)**
- **D ग्रेडसाठी — 0 (35% & below marks)**
- **E ग्रेडसाठी — 4 (Exempted subject )**
- **गैरहजरसाठी विद्यार्थ्यासाठी — A**
- **अपंगासाठी (Handicapped) — 5 (फक्त शारिरीक शिक्षणाकरीता) (मात्र इतर विषयास श्रेणी द्यावी)**
- **मार्च २००८ पूर्वीचे परीक्षार्थी मार्च २०२० च्या परीक्षेस रिपीटर म्हणून प्रविष्ठ होत असतील तर अशा विद्यार्थ्यांची NN श्रेणी दर्शवावी.**

**३ ) पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे शालेय वैकल्पिक विषयास पास श्रेणी मिळून त्यांचा तो विषय सुटलेला असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे श्रेणीतक्ते भरताना त्या विषयापुढे विषय सूटसाठी 4 (Exempted) अशी श्रेणी दर्शवावी.**

४) काही नियमित पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी/ज्या विद्यार्थ्यांचे श्रेणी परीक्षेचे विषय सुटलेले नाहीत असे विद्यार्थी मार्च २०२० च्या परीक्षेस प्रविष्ठ होत असतील तर त्याचे श्रेणीतक्ते भरताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकासमोर शालेय व ऐच्छिक विषयाचे कोड नंबर नमुद करून त्या विषयात विद्यार्थ्याने संपादीत केलेली श्रेणी (Grade) अचूक नोंदवाव्यात.

<u>**५) गैरहजर विद्यार्थ्यासाठी A व ३५% पेक्षा कमी श्रेणी दर्शविताना ० श्रेणी लाल शाईने लिहाव्यात.** मात्र या श्रेणी लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यास ३५% पेक्षा कमी गुण व विद्यार्थी गैरहजर असल्याची खात्री करूनच श्रेणी लिहाव्यात. मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की निकालानंतर 0 व A श्रेणी दिलेला विद्यार्थी लेखी परीक्षेस उत्तीर्ण असूनही केवळ या श्रेणी दिल्यामुळे त्यांचा निकाल अनुत्तीर्ण म्हणून जाहिर होतो. निकालानंतर शाळाप्रमुख श्रेणी दुरूस्ती व निकाल दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करतात. निकालानंतर कोणत्याही श्रेणीमध्ये व निकालात बदल केला जाणार नाही व विद्यार्थ्यास चूकीची श्रेणी दिल्यामुळे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शाळाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.</u>

17.02

**विभागीय सचिव**

**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रति, सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना**

**सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हा.**